# जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी, ठाणे यांचे कार्यालय

पत्ता : १, जिल्हा निवडणूक शाखा, तळ मजला, जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे, (प)-४०० ६०१.
दुरध्वनी क्रमांक :- ०२२-२५३४ २१२५, फॅक्सनं :- ०२२-२५४५४१४२

Website - www.thaneelection.com

---

क्र. निवडणूक/ कक्ष-१/टे-३/ कावि- १७ /२०२३
दि.२३/०१ /२०२३

प्रति,
१.उपायुक्त निवडणूक , ठाणे महानगरपालिका
२.उपायुक्त निवडणूक, नवीमुंबई महानगरपालिका
३.उपायुक्त निवडणूक, कल्याण डोंबिवली महानगरपालिका
४.उपायुक्त  निवडणूक, मिरा भाईंदर महानगरपालिका
५.उपायुक्त निवडणूक , भिवंडी निजामपूर महानगरपालिका
६.उपायुक्त निवडणूक, उल्हासनगर महानगरपालिका
७.उप मुख्याधिकारी, कुळगांव बदलापूर नगरपालिका
८.उप मुख्याधिकारी, अंबरनाथ नगरपरिषद

विषय :- राष्ट्रीय मतदार दिन कार्यक्रम,२०२३ राबविणेबाबत.

संदर्भ :- १. मा.मुख्य निवडणूक अधिकारी,महाराष्ट्र राज्य यांचेकडील पत्र क्र.ईएलआर-२०२२/ प्र.क्र.८९२/२२/३३  दिनांक :- २० जानेवारी,२०२३
२.मा.भारत  निवडणूक आयोगाकडिल पत्र क्र.४९१/eci/let/func/sveep-१/२०२२,दि.१०/१/२०२३
३.या कार्यालयाचे पत्र क्र. निवडणूक/ कक्ष-१/टे-३/ कावि- १२ /२०२३, दि. १२ /०१ /२०२३

दि.२५ जानेवारी, १९५० रोजी भारत निवडणूक आयोगाची स्थापना झाली. आयोगाचा हा स्थापना दिवस २०११ पासून संपूर्ण देशभरात – राष्ट्रीय मतदार दिन म्हणून साजरा केला जातो. राष्ट्रीय मतदार दिन साजरा करण्याचा मुख्य उद्देश हा मतदारांना, विशेषत:नवमतदारांना मतदार यादीत नाव नोंदणीसाठी प्रोत्साहन देणे,सुलभरित्या त्यांची नाव नोंदणी करून घेणे, हा आहे. देशातील मतदारांना समर्पित केलेल्या या दिवसाचा उपयोग मतदारांचा निवडणूक प्रक्रियेतील सहभाग वाढावा म्हणून त्यांना जागरूक करण्यासाठी केला जातो.

मा. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांनी वरील संदर्भिय पत्रांन्वये  यंदाचा राष्ट्रीय मतदार दिन साजरा करणेबाबत जे निर्देश सदर पत्रात नमूद केले त्यानुसार आपणास या कार्यालयाचे संदर्भिय पत्रान्वये कळविणेत आले होते.

तथापि मा. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचेकडिल दि. २०/१/२०२३ रोजीचे पत्रा सोबत मा. भारत निवडणूक आयोगाच्या दि.१०/१/२०२३ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त  मराठी भाषांतरीत प्रत योग्य त्या कार्यवाहीस्तव   जोडली आहे.

सोबत :- सहपत्रे

AVKadam

(अर्चना कदम)
उपजिल्हा निवडणूक अधिकारी,ठाणे

# मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय

क्र.ईएलआर २०२२/प्र.क्र.८९२/२२/३३,
सामान्य प्रशासन विभाग, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई - ४०००३२,
दि. २० जानेवारी, २०२३.

प्रति,
जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, सर्व

**विषय :- राष्ट्रीय मतदार दिन कार्यक्रम, २०२३ राबविणेबाबत.**
संदर्भ :- भारत निवडणूक आयोगाचे पत्र क्र.४९१/ECI/LET/FUNC/SVEEP-I/२०२२, दि.१०.०१.२०२३

महोदय / महोदया,

उपरोक्त विषयांकित भारत निवडणूक आयोगाच्या संदर्भाधिन दि.१०.०१.२०२३ रोजीच्या पत्राचे मराठी भाषांतर करुन मराठी भाषांतरीत प्रत पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव सोबत जोडून पाठवित आहे.

आपला,

(शरद दळवी)
अवर सचिव तथा उप मुख्य निवडणूक अधिकारी,
महाराष्ट्र राज्य

प्रत :- उपजिल्हाधिकारी तथा उप जिल्हा निवडणूक अधिकारी, सर्व

भारत निवडणूक आयोग

निर्वाचन सदन, अशोक मार्ग, नवी दिल्ली – ११० ००१

क्रमांक ४९१ / भा नि आ / पत्र / कार्य / एस व्ही ई इ पी १ / २०२२ दिनांक १० जानेवारी २३

प्रति

सर्व राज्यांचे व केंद्रशासित प्रदेशांचे
मुख्य निवडणूक अधिकारी

विषय : दिनांक २५ जानेवारी २०२३ रोजी राष्ट्रीय मतदार दिनाबाबत.

महोदय / महोदया,

दिनांक २५ जानेवारी २०२३ रोजी राष्ट्रीय मतदार दिन हा मतदान केंद्र, राज्य व राष्ट्रीय स्तरावर साजरा होण्याबाबत आपणास कळविण्याचे मला निर्देशित करण्यात आले आहे. "मतदानाइतकं अमूल्य नसे काही, बजावू हमखास मताधिकार आम्ही" हे राष्ट्रीय मतदार दिन २०२३ चा विषय (Theme) आहे. उपरोक्त विषयाला अनुसरून राष्ट्रीय मतदार दिन साजरा करण्याची, तसेच त्याची मोठ्या प्रमाणात प्रचार - प्रसिद्धी करण्याची आपणास विनंती आहे.

२. राष्ट्रीय मतदार दिनाच्या आगामी सोहळ्यातच " मै भारत हूँ " या गीताचे प्रक्षेपण (Launching) करण्यात येईल. राष्ट्रीय मतदार दिन २०२३ चे मतदान केंद्र, राज्य व राष्ट्रीय स्तरावरील सर्व कार्यक्रम हे शक्यतोवर दुपारी ०१ : ०० वाजता अथवा त्यानंतर आयोजित करण्यात यावेत, जेणेकरून सदर सोहळ्यातच " मै भारत हूँ" हे गीत वाजविण्यात येईल.

३. राज्य स्तरावरील आणि जिल्हा स्तरावरील राष्ट्रीय मतदार दिनाच्या समारंभामध्ये खालील घटक समाविष्ट असतील. कोव्हीडबाबतची योग्य आचारसंहिता लक्षात घेऊन राष्ट्रीय मतदार दिनाचे कार्यक्रम आयोजित करावेत.

**सर्वसमावेशक प्रचार - प्रसार आराखडा :-**

- राष्ट्रीय मतदार दिनाच्या वरील विषयाला अनुलक्षून राज्य स्तरावर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात यावे. तसेच वृत्तपत्रे, दूरचित्रवाणी, आकाशवाणी याद्वारे जाहिराती जारी करून, सामाजिक माध्यमांद्वारे तसेच विविध क्षेत्रीय उपक्रमे आयोजित करुन वेबीनार व परिसंवाद यांच्या माध्यमाद्वारे प्रचार व प्रसिद्धी करुन राष्ट्रीय मतदार दिन साजरा करण्याच्या कार्यक्रमाचे नियोजन करण्यात यावे.
- विविध शासकीय योजनांच्या व कार्यक्रमांच्या माध्यमातून राष्ट्रीय मतदार दिनाच्या विषयाची (Theme) प्रचार व प्रसिद्धी करण्यात यावी.
- मुख्य निवडणूक अधिकारी, जिल्हा निवडणूक अधिकारी व निवडणूक नोंदणी अधिकारी यांच्या कार्यालयांमध्ये आणि मतदार सुविधा केंद्रांमध्ये राष्ट्रीय मतदार दिनाचा विषय व त्या अनुषंगाने संदेश हे भित्तीचित्र व जाहिरात फलकांच्या स्वरुपात प्रदर्शित करण्यात यावेत.
- राष्ट्रीय मतदार दिनाच्या विषयाकडे (Theme) लक्ष वेधून घेणारी जाहिरात वर्तमानपत्रांमधून दिनांक २५ जानेवारी रोजी प्रकाशित करण्यात यावी.

**राज्य / जिल्हा स्तरावरील आदर्श (Icon) व्यक्तींचे समावेशन**

- आयोगाचे विविध उपक्रमांच्या बाबत जागरुकता निर्माण करण्यासाठी व "मतदानाइतकं अमूल्य नसे काही, बजावू हमखास मताधिकार आम्ही" या विषयसूत्राला व्यापक प्रसिद्धी मिळण्यासाठी या संदर्भात राज्य / जिल्हा स्तरावरील आयकॉन यांच्याकडून ऑडीओ / व्हिडीओ संदेश घेऊन ते प्रसारीत करण्यात यावेत.

**भागीदारी व सहयोग**

- मुख्य निवडणूक अधिकारी / जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी बँका, पोस्ट, रेल्वे, पंचायती राज्य संस्था, अशासकीय नागरी संस्था इत्यादी विविध शासकीय विभागांशी भागीदारी करुन त्यांचा सहयोग घेण्यात यावा.

- राष्ट्रीय मतदार दिवसा निमित्ताने निबंधस्पर्धा, वादविवाद स्पर्धा, वक्तृत्वस्पर्धा, परिसंवाद असे विविध कार्यक्रम आयोजित करण्यासाठी निगमिय संस्था, नागरी संस्था व तत्सम अन्य संस्थांचा सहयोग घेण्यात यावा.
- त्याचप्रमाणे राष्ट्रीय मतदार दिनाच्या दिवशी राष्ट्रीय मतदार दिनाची शपथ घेण्यासाठी विविध विभाग / संघटना / संस्थांना प्रोत्साहित करण्यात यावे. त्याबाबतची छायाचित्रे / दृक्श्राव्य चित्रीकरणे त्यांच्या संकेतस्थळ व सामाजिक माध्यमांवर हॅशटॅग वापरून अपलोड करण्यात यावेत.

<u>समाज माध्यमांशी सहयोग उपक्रम</u>

- राष्ट्रीय मतदार दिनासाठी सर्जनशील मजकूर निर्माण करण्यासाठी व विकसित करण्यासाठी मुख्य निवडणूक अधिकारी / जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी विविध समाज माध्यम संस्थाशी भागिदारी करावी.
- विविध विभाग व संस्थांनी केलेली सर्व उपक्रम त्यांनी त्यांच्या समाज माध्यमाच्या पृष्ठांवर अपलोड करावे
- सदर मजकूर समाज माध्यमातील पृष्ठांवर अपलोड करताना # VD२०२३, # vhotdenejaaenge, # NothinglikeVoting, #bridgingtheVotingGap, #MyVoteMyPower अशा हॅशटॅगचा वापर करावा

१. महत्वाचे उपक्रम : राष्ट्रीय मतदार दिनाच्या निमित्त सर्व स्वीपचे उपक्रम कोव्हीडबाबतचा आचार संहीतेचे पालन करुन आयोजित करण्यात यावेत.

**अ) मतदान केंद्र स्तरावरील उपक्रम :**

१. मतदान केंद्र स्तरावरील अधिकाऱ्यांनी प्रत्येक मतदान केंद्रावर उपक्रमांचे आयोजन करावे व नव्याने नोंदणी झालेल्या नव मतदारांचा गौरव करून त्यांना मतदार निवडणूक ओळखपत्रे द्यावीत.

२. व्हाट्स ॲप गट व अन्य माध्यमातून राष्ट्रीय मतदार दिनासंबंधिचे व्हिडीओ चित्रण व अन्य सर्जनशील मजकूर सर्व कुटुंबांमध्ये / सहभाग्यांमध्ये व्यापक प्रमाणात प्रसारित करण्यात यावा. तसेच टपालाद्वारे मतदान, मतदान केंद्राच्या ठिकाणी उपलब्ध आश्वासित किमान सुविधा, इलेक्ट्रोनिक मतदान यंत्र / व्हिव्हिपॅट (V V P A T), वोटर हेल्पलाईन

ॲप, नैतिक मतदान इत्यादी विषयांशी संबंधित जागरुकता निर्माण स्थानिक भाषेतील चित्रफिती / माहितीपट या राष्ट्रीय मतदार दिनाच्या निमित्त आयोजित कार्यक्रमात प्रदर्शित करण्यात याव्यात.

३. सदर कार्यक्रमात उपस्थित सर्व लोकांना राष्ट्रीय मतदार दिनाची शपथ देण्यात यावी. तसेच सदर शपथेची प्रत ही विविध व्हाट्स ॲप गटात देखील प्रसारित करावी.

४. जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी प्रत्येक मतदान केंद्राच्या अखत्यारीत होणाऱ्या या कार्यक्रमाला साहीत्य / सामान (logistics) पूरवावे.

ब) जिल्हा मुख्यालयातील उपक्रम

१. पंचायत राज्य संस्था, शैक्षणिक संस्था, नागरी संस्थांचे गट , तरुण स्वयंसेवकांच्या राष्ट्रीय समाज सेवा, राष्ट्रीय छात्र सेना, स्काउट व गाईड , नेहरू युवा केंद्र संघटन यासारख्या विविध संस्था / संघटनांशी सहयोग करून जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी जिल्ह्याच्या मुख्यालयाच्या ठिकाणी कार्यक्रम आयोजित करावेत.

२. राष्ट्रीय मतदार दिनाच्या निमित्ताने नव्याने नोंदणी केलेल्या मतदारांना मतदार निवडणूक ओळखपत्र देऊन त्यांचा यथोचित गौरव करण्यात यावा

३. सदर कार्यक्रमात उपस्थित सर्व लोकांना राष्ट्रीय मतदार दिनाची शपथ देण्यात यावी. तसेच सदर शपथेची प्रत ही विविध व्हाट्सॲप गटात देखील प्रसारित करावी.

४. टपालाद्वारे मतदान, मतदान केंद्राच्या ठिकाणी उपलब्ध आश्वासित किमान सुविधा, इलेक्ट्रोनिक मतदान यंत्र / व्हिव्हिपॅट (VVPAT), वोटर हेल्पलाईन ॲप, नैतिक मतदान इत्यादी विषयांशी संबंधित जागरुकता निर्माण करणाऱ्या स्थानिक भाषेतील चित्रफिती / माहितीपट या राष्ट्रीय मतदार दिनाच्या निमित्त आयोजित कार्यक्रमात प्रदर्शित करण्यात याव्यात.

क) राज्याच्या मुख्यालयातील उपक्रम

१. माध्यमे, नागरी संस्था, स्वयंसेवकांचे गट , राज्य प्रशासन, राज्य निवडणूक आयोग, व निगम / महामंडळांशी सहयोग करून मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी राज्याच्या राजधानीत कार्यक्रम आयोजित करावा.

२. टपालाद्वारे मतदान, मतदान केंद्राच्या ठिकाणी उपलब्ध आश्वासित किमान सुविधा, इलेक्ट्रोनिक मतदान यंत्र / व्हिव्हिपॅट ( V V P A T ), वोटर हेल्पलाईन अॅप, नैतिक मतदान इत्यादी विषयांशी संबंधित जागरुकता निर्माण करणाऱ्या स्थानिक भाषेतील चित्रफिती / माहितीपट या राष्ट्रीय मतदार दिनाच्या निमित्य आयोजित कार्यक्रमात प्रदर्शित करण्यात याव्यात.

३. राष्ट्रीय मतदार दिनाच्या निमित्ताने नव्याने नोंदणी केलेल्या मतदारांना मतदार निवडणूक ओळखपत्र देऊन त्यांचा यथोचित गौरव करण्यात यावा

४. सदर कार्यक्रमात उपस्थित सर्व लोकांना राष्ट्रीय मतदार दिनाची शपथ देण्यात यावी. तसेच सदर शपथेची प्रत ही विविध व्हाट्स अॅप गटात देखील प्रसारित करावी. मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांच्या संकेतस्थळावर सदर शपथ पत्राचा मसुदा उपलब्ध करून देण्यात यावा.

५. सदर कार्यक्रमात सांकेतिक भाषा उकल करणारे (Sign Language Interpreters) नियुक्त करावेत. राष्ट्रीय मतदार दिनाच्या कार्यक्रमाचे स्थान हे सर्व प्रकारच्या नागरिकांना सहजगत्या अभिगम्य (accessible) असे तयार करण्यात यावे.

६. राज्यभरातील विविध ठिकाणी जाहिरात फलक व भित्तीचित्रे याद्वारे तसेच छापील / इलेक्ट्रोनिक माध्यमांद्वारे आवश्यक त्या जाहिराती करण्यात याव्यात.

७. " मतदानासारखे दुसरे काहीच नाही, मी नक्कीच मतदान करणार " हे यावर्षीच्या राष्ट्रीय मतदार दिनाचे विषयसूत्र असल्यामुळे दिव्यांग व्यक्ती, महिला, ज्येष्ठ नागरिक व समाजातील वंचित घटकांना सहभागी करून घेऊन उपक्रमांचे आयोजन करण्यात यावे.

४. " मै भारत हूँ " गीताच्या प्रसारणाच्या (Launching) अनुषंगाने खाली नमूद केलेले उपक्रम अपलोड करताना # NVD२०२३, # vhotdenejaaenge, # MainBharatHun, अशा हॅशटॅगचा उपयोग करावा. तसेच " मै भारत हूँ " हे गीत राष्ट्रीय मतदार दिनाच्या दिवशी दुपारी ०१ : ०० वाजता भारतीय निवडणूक आयोगाच्या राष्ट्रीय मतदार दिनाच्या निमित्त स्वीप संकेतस्थळावर उपलब्ध होईल.

" मै भारत हूँ " या गाण्याच्या विमोचनाच्या निमित्ताने खालील निर्देशांची नोंद घेण्यात यावी.

<u>राज्य मुख्यालयातील उपक्रम:</u>

- सदर गाण्याची लिंक ही योग्य वेळी मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना पाठविण्यात येईल. सदर लिंक ही सर्व जिल्हा निवडणूक अधिकारी, समाज माध्यमे, व्हाट्स ॲप गट, संकेतस्थळ इत्यादी ठिकाणी व्यापक प्रमाणात प्रसारित करण्यात यावी.
- तसेच सदर गाण्याचा लोगो / ग्राफिक क्रिएशन हे योग्य वेळी पाठविण्यात येईल. ते राज्यातील सर्व शासकीय संकेतस्थळांवर ठळकपणे झळकले पाहिजे.
- भारतीय निवडणूक आयोगाने प्रसारीत (Launch) केलेल्या गाण्याबाबत लेख / प्रतिक्रिया देण्यासाठी मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी राज्यातील राज्य आयकॉन यांना विनंती करावी.

<u>जिल्हा मुख्यालयातील उपक्रम :-</u>

- सदर गाण्याची लिंक ही सर्व जिल्हा निवडणूक अधिकारी, समाज माध्यमे, व्हाट्स ॲप गट , संकेतस्थळ इत्यादी ठिकाणी व्यापक स्तरावर प्रसारित करण्यात यावी.
- जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी शक्य असल्यास सिनेमागृहांमध्ये चित्रपट सुरु होण्यापूर्वी किंवा मध्यंतरात एक सार्वजनिक संदेशाचा भाग म्हणून "मै भारत हूँ" हे गाणे वाजवावे / प्रदर्शित करावे.
- शक्य असेल तिथे, जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी स्थानिक खरेदी केंद्रे (मॉल्स) व उपहारगृहात सार्वजनिक संदेशाचा एक भाग म्हणून " मै भारत हूँ " हे गाणे वाजविले जाईल / प्रदर्शित होईल असे पाहावे.
- भारतीय निवडणूक आयोगाने विमोचीत केलेल्या गाण्याबाबत लेख / प्रतिक्रिया देण्यासाठी जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील आयकॉन यांना विनंती करावी.

<u>मतदान केंद्र स्तरावरील उपक्रम</u>

- सदर गाण्याची हिंदी तसेच स्थानिक भाषेतील आवृत्ती सर्व मतदान केंद्रांवर प्रदर्शित करावी.
- सर्व व्हाट्स ॲप गटांमध्ये सदर गाण्याची जोडणी सामाईक होईल व ती बहुतांशी कुटुंबांपर्यंत पोहोचेल याची गट विकास अधिकाऱ्यांनी खातरजमा करावी
- सर्व शाळा, महाविद्यालये, निवडणूक साक्षरता मंडळ इत्यादी ठिकाणी सदर गाण्याचे प्रसारण करण्यात यावे.

मुख्य निवडणूक अधिकारी / जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांच्या कार्यालयातून राष्ट्रीय मतदार दिनाच्या तयारीचे संनियंत्रण करण्यात यावे. वैधानिक प्राधिकरणाने कोव्हीड बाबत विहित केलेल्या आचार संहितेचे पालन करुन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे.

आपला विश्वासू

स्वाक्षरी

संतोषकुमार

सचिव

संलग्न : राष्ट्रीय मतदार दिनाची शपथ